# The Act for Avoiding Wagers (Amandment) Act, 1865 (BOMBAY III OF 1865)

## पैज लावण्यास प्रतिबंध करण्यासंबंधी विधि (सुधारणा) अधिनियम १८६५

अनुक्रमणिका


प्रस्तावना — पृष्ठ

कलमें — २५७

१. करार रद्द व निरर्थक असल्याचें जाहीर करणें. अशा करारांबाबत कोणत्याहि दाव्यास परवानगी असणार नाही. — २५७

२. जुगाराच्या किंवा पैजेच्या स्वरूपाच्या कराराच्या संबंधांत अडत किंवा दलाली वगैरेसाठीं देखील दावा करण्यास परवानगी असणार नाही. — २५७

३. जी देणीं देण्यासाठीं पालक आणि व्यक्तिगत प्रतिनिधि यांना पैसा जमा करण्यास परवानगी देतां कामा नये अशीं देणीं. — २५८

४. रद्द करणें आणि बचाव ... ... ... ... ... ... — २५८

५ [रद्द करण्यांत आलें] ... ... ... ... ... ...

# सन १८६५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३*

## पैज लावण्यास प्रतिबंध करण्यासंबंधी विधि (सुधारणा) अधिनियम, १८६५.

(३१ जुलै १८६५)

हा अधिनियम पुढील अधिनियमान्वयें अंशतः रद्द करण्यांत आला.—

सन १८९५ चा मुंबई अधिनियम १६.

सन १८८६ चा मुंबई अधिनियम ३.

या अधिनियमांत पुढील अधिनियमान्वयें सुधारणा करण्यांत आली :—

सन १९५९ चा मुंबई अधिनियम २१

पैज लावण्यास प्रतिबंध करण्यासंबंधींचा विधि सुधारण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, मुंबई राज्याच्या संबंधांत असेल तेथवर, पैज लावण्यास प्रतिबंध करण्यासंबंधींचा विधि सुधारणें इष्ट आहे ; त्याअर्थी, पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :— प्रस्तावना.

१. जुगाराच्या किंवा पैजेच्या स्वरूपाच्या कबुलायती करण्यास मदत करण्यासाठीं किंवा साहाय्य करण्यासाठीं, किंवा त्यांची अंमलबजावणी करण्यासाठीं जाणूनबुजून केलेले सर्व करार— मग ते तोंडी केलेले असोत, लेखी केलेले असोत किंवा इतर रीतीनें केलेले असोत—आणि अशा कबुलायती किंवा करार यांची अंमलबजावणी करण्याच्या तारणाच्या किंवा हमीच्या स्वरूपाचे सर्व करार रद्द व निरर्थक होतील. आणि कोणत्याहि अशा कराराच्या किंवा करारांच्या संबंधांत किंवा वर सांगितलेल्या कोणत्याहि कबुलायतीच्या किंवा कबुलायतीच्या संबंधांत दिलेली किंवा द्यावयाची पैशाची कोणतीहि रक्कम बसूल करण्यासाठीं, कोणत्याहि न्यायालयांत कोणताहि दावा करण्यास परवानगी असणार नाहीं. करार रद्द व निरर्थक जाहीर करणें. अशा करारांबाबत कोणत्याहि दाव्यास परवानगी असणार नाहीं.

२. जुगाराच्या किंवा पैजेच्या स्वरूपाची कोणतीहि अशी कबुलायत जाणूनबुजून करण्याच्या संबंधांत किंवा तिची अंमलबजावणी करण्याच्या संबंधांत किंवा अशी कबुलायत करण्यास किंवा तिची अंमलबजावणी करण्यास जाणूनबुजून मदत करण्याच्या संबंधांत किंवा अशा कबुलायतीच्या संबंधांत अन्यथा दावा सांगितलेली किंवा दावा सांगण्याजोगी कोणतीहि अडत, दलाली, फी किंवा बक्षीस बसूल करण्यासाठीं कोणत्याहि न्यायालयांत कोणताहि दावा करण्यास परवानगी असणार नाहीं—मग अशा दाव्यांतील वादी अशा शेवटीं सांगितलेल्या कबुलायतींत किंवा करारांत अथवा जुगाराचा किंवा पैजेच्या स्वरूपाच्या कोणत्याहि अशा कबुलायतीच्या किंवा वर सांगितलेल्या करार यांच्या संबंधांत अडत, दलाली, फी किंवा बक्षीस यांच्या रूपानें कोणत्याहि इसमांच्या खातीं जाणूनबुजून दिलेली किंवा द्यावयाची पैशांची कोणतीहि रक्कम बसूल करण्यासाठीं असलेल्या कोणत्याहि दाव्यांत पक्षकार असो किंवा नसो. जुगाराच्या किंवा पैजेच्या स्वरूपाच्या कराराच्या संबंधांत अडत किंवा दलाली वगैरेसाठीं देखील दावा करण्यास परवानगी असणार नाहीं.

३. कोणत्याहि मृत इसमाचा कोणताहि पालक, अंमलबजावणी करणारा, व्यवस्थापक, वारस किंवा व्यक्तिगत प्रतिनिधि यास, अशा मृत इसमाच्या वतीनें (किंवा पालकाच्या बाबतींत, कोणत्याहि अवयस्काच्या वतीनें) भारतीय करार अधिनियम, १८७२, याचें कलम ३० यांत ज्याचा उल्लेख केला आहे अशा कोणत्याहि कबुलायतीच्या किंवा कबुलायतीच्या संबंधांत किंवा या अधिनियमाचीं कलमें १ व २ यांत अनुक्रमें उल्लेख केले आहेत अशा, त्या कराराच्या किंवा करारांच्या संबंधांत दिलेली किंवा द्यावयाची अडत, जीं देणीं देण्यासाठीं पालक आणि व्यक्तिगत प्रतिनिधि यांना पैसा

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

जमा करण्यास दलाली, फी किंवा बक्षीस यांच्या संबंधांत त्याने दिलेल्या रकमांसाठीं किंवा अशा रकमांच्या संबंधांत त्याच्या खात्याच्या रकमेवर कोणतीहि रक्कम कर्जाऊ दिली जाणार नाहीं.

परवानगी देतां कामा नये अशीं देणीं.

रद्द करणें व बचाव.

"४. कच्छ विधि (लागू करण्याबाबत) आदेश, १९४९, अन्वयें मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू केलेला, पैज लावण्यास प्रतिबंध करण्यासंबंधींचा विधि सुधारण्याबाबत अधिनियम, १८६५ हा, याद्वारें रद्द करण्यांत येत आहे:

परंतु, अशा रीतीनें अधिनियम रद्द केल्यामुळें—

(अ) अशा रीतीनें रद्द केलेल्या अधिनियमाच्या पूर्वीच्या अंमलास किंवा तदन्वयें योग्य रीतीनें केलेल्या किंवा करू दिलेल्या कोणत्याहि गोष्टीस ;

(ब) अशा रीतीनें रद्द केलेल्या अधिनियमान्वयें संपादन केलेल्या किंवा प्राप्त झालेल्या कोणत्याहि हक्कास, विशेषाधिकारास किंवा पत्करलेल्या कोणत्याहि बंधनास किंवा जबाबदारीस ; किंवा

(क) वर सांगितलेल्या अशा कोणत्याहि हक्काच्या, विशेष अधिकाराच्या, बंधनाच्या किंवा जबाबदारीच्या संबंधांतील कोणत्याहि वैध कारवाईस किंवा उपाययोजनेस,

बाध येणार नाहीं, आणि जणूं पैज लावण्यास प्रतिबंध करण्यासंबंधींचा अधिनियम लागू करण्याबाबत व सुधारण्याबाबत मुंबई अधिनियम, १९५९, हा संमत झाला नव्हता असें समजून अशी कोणतीहि वैध कारवाई किंवा उपाययोजना दाखल करतां येईल, पुढें चालवितां येईल किंवा अंमलांत आणतां येईल."

५. [सन १८८६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याद्वारें रद्द करण्यांत आलें.]